# सुधीर ढवळेंच्या अटकेच्या निमित्ताने

**चन्द्रशेखर पुरन्दरे**

व्याख्येनेच राज्यसंस्थेकडे देशांतर्गत हिंसा करण्याची मक्तेदारी असते. अशी संस्थात्मक हिंसा राज्यसंस्थाच वैध ठरवते. मग ती दमनकारी व्हायला वेळ लागत नाही. एक जागतिक नजर टाकली तर लक्षात येईल की कोणत्याच राजवटीला तात्त्विक विरोध मान्य नसतो. मग ती राजवट भारत, अमेरिका, ब्रिटनसारखी लोकशाही असो किंवा मध्यपूर्वेतील अनेक मुस्लिम राष्ट्रांसारखी एकाधिकारशाही असो किंवा चीनसारखी एकपक्षीय हुकूमशाही असो किंवा रशियासारखी दिखाऊ लोकशाही असो. लोकशाही देशांमध्ये विरोधी पक्षाचे अस्तित्व मान्य असल्याने विरोध सहन केला जातो असा आभास निर्माण होतो. पण जरा निरखून पाहिले, तर प्रमुख राजकीय पक्षांमध्ये आदर्शवादात फरक नसतो. अमेरिकेत रिपब्लिकन आणि डेमोक्रॅटिक हे दोन प्रमुख पक्ष आहेत. त्यांच्या मूलभूत आदर्शवादात फरक नाही. अमेरिकेचा जागतिक साम्राज्यवाद लष्कर आणि भांडवल यांच्या बळावर कसा वाढवता येईल याच प्रयत्नांत दोन्ही पक्ष आहेत. ब्रिटनमध्ये कॉन्झर्वेटिव, लेबर आणि लिबरल हे तीन प्रमुख पक्ष आहेत. या तीनही पक्षांत धोरणांच्या दृष्टीने मूलभूत फरक आढळत नाही. तीच गोष्ट फ्रान्स, जर्मनी, ऑस्ट्रेलिया, जपान या इतर विकसित लोकशाहीत आढळते.

भारतीय लोकशाहीत अजून सरंजामशाही मोठ्या प्रमाणावर आहे. केंद्रीय राजकारणात नेहरू घराण्याची पकड स्वातंत्र्यापासून आजवर अबाधित आहे. पण अगदी महाराष्ट्रातील जिल्हा पातळीवरही 'सहकारी' कुटुंबाने एकेक जिल्हा आपली वैयक्तिक जहागीर असल्यासारखा ताब्यात ठेवलेला आहे. मात्र, राष्ट्रीय स्तरावर किंवा प्रादेशिक स्तरावर पक्षीय राजकारणात 'विकसित' लोकशाही देशातीलच परिस्थिती भारतात दिसते. काँग्रेस व भारतीय जनता पक्ष किंवा अगदी द्रमुक - अण्णा द्रमुक यांच्यात मूलभूत फरक दिसत नाही.

याचे कारण म्हणजे या देशातील संसदीय पक्ष एकाच संदर्भ चौकटीत वावरतात. ती संदर्भचौकट शाबूत ठेवण्यात त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात. पण या संदर्भचौकटीतच जर वैयक्तिक किंवा संघटितरीत्या आव्हान कोणी दिले, तर विचार-प्रचार स्वातंत्र्याचा गजर किती मानभावी आहे, हे लगेच उघड होते.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सध्या गाजणारे एक उदाहरण राज्यसंस्थेचे हे खरे स्वरूप स्पष्ट करेल. विकिलिक्स नावाची इंटरनेटवर आधारित एक संघटना आहे. तिचा संस्थात्मक ज्युलियन असांगे हा जन्माने ऑस्ट्रेलियन पण जगभर फिरत असणारा गोरा इंटरनेट तस्कर आहे. इंटरनेटवर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय संदेशांची (सरकारी संदेशांची) उचल करून ते संदेश सार्वजनिक करणे हा उद्योग असांगे गेली काही वर्षे करत आहे. विविध देशांतील सरकारे अधिकृतरीत्या काय धोरण जाहीर करतात आणि प्रत्यक्षात हे धोरण आखणाऱ्याचे म्हणजे राज्यकर्त्यांचे, अंतर्गत 'खरे' डावपेच आणि 'खरे' धोरण काय असते हे विकिलिक्स उघड करते. त्यासाठी विविध देशांतील राजदूत त्या-त्या देशांतून आपल्या परराष्ट्र मंत्रालयाला काय संदेश गुप्तपणे पाठवतात ते विकिलिक्सने प्रसिद्ध करायला सुरूवात केली आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेचा भारतातील राजदूत अधिकृतरीत्या असे म्हणत असेल की भारत ही जगातली सगळ्यात मोठी लोकशाही आहे आणि उगवती महासत्ता आहे. पण प्रत्यक्षात तो आपल्या परराष्ट्र खात्यास असे कळवत असेल की हा फार हिंसक देश आहे, इथे विषमता फार आहे. हे गोपनीय अहवाल प्रसिद्ध होणे ना अमेरिकेला सोईचे ना भारताला. विकिलिक्स सध्या नेमके हेच करत आहे. यापूर्वीही असांगेने अफगाणिस्तानात अमेरिकेच्या कारवाई दरम्यान निष्पाप अफगाणांना अमेरिकन सैनिकांनी कसे थंडपणे ठार मारले, इराकमध्ये एका वार्ताहराचा हेलिकॉप्टरमधून गोळीबार करून दिवसाढवळ्या कसा खून केला, अशा बातम्या प्रसिद्ध केल्या आहेत. या बातम्या म्हणजे वस्तुत: त्या ठिकाणी त्यावेळी असलेल्या लष्करी अधिकाऱ्यांनी आपल्या वरिष्ठांना पाठवलेले संदेशच आहेत. त्यामुळे हे सत्य राज्यसंस्थेला चांगलेच झोंबते.

मागच्या वर्षी, गेल्या दोन-चार महिन्यांत, नवीन गौप्यस्फोटांना विकिलिक्सने सुरूवात केली. जवळजवळ अडीच लाख गुप्त संदेश प्रसिद्ध करणार असे जाहीर करण्यात आले. त्यासाठी पाश्चात्त्य जगातील प्रमुख वर्तमानपत्रांशी विकिलिक्सने संधान बांधले. ही वृत्तपत्रे म्हणजे अमेरिकेतील न्यूयॉर्क टाइम्स, ब्रिटनमधील द गार्डियन, जर्मनीतील डेर श्पीगेल, फ्रान्समधील मोंद आणि स्पेनमधील एल् पेस. ही सगळीच वृत्तपत्रे एकाच वेळी विकिलिक्सने पुरवलेली माहिती प्रसिद्ध करू लागली. अजूनही हे प्रकरण चालूच आहे.ज्युलियन असांगे अनेक स्वयंसेवकांबरोबर हा कारभार करतो. त्यात त्याला व्यक्तिश: आर्थिक लाभ नाही किंवा विकिलिक्सलाही आर्थिक लाभ नाही, सामान्य माणसांच्या देणग्या हे प्रकरण चालवतात.

असांगे आणि विकिलिक्सला गेल्या काही वर्षांत या धाडसी पत्रकारितेबद्दल अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कारही मिळाले आहेत. 'टाईम' या अमेरिकन साप्ताहिकाच्या २०१० सालच्या Person of the year ला तो दुसऱ्या क्रमांकावर होता. त्याआधी The Economist या ब्रिटिश साप्ताहिकाच्या २००८ सालचा पुरस्कार त्याला मिळाला. ॲम्नेस्टी इंटरनॅशनलनेही २००९ ला पारितोषिक दिले होते. 'सत्ताधीशांचे बुरखे फाडा' हा एक कलमी कार्यक्रम विकिलिक्स चालवत आहे.

गेल्या काही महिन्यांतील या प्रकाशनांमुळे पश्चिमेत व मध्यपूर्वेत प्रचंड खळबळ माजली आहे. विशेषत: मध्यपूर्वेतील मुस्लिम हुकूमशाही राजवटी. अधिकृतरीत्या त्या इस्रायल-पॅलेस्टाईन वादामध्ये सतत इस्रायलविरोधी भूमिका घेत असतात. पण प्रत्यक्षात, त्यांचे हुकूमशहा (उदाहरणार्थ, सौदी अरेबियाचा राजा किंवा येमेनचा लष्करशहा) त्यांच्या अंतर्गत वैरासाठी इस्रायलला मदत करतात. शिया-सुन्नी दुश्मनीसाठी इस्रायलने व अमेरिकेने इराणवर बॉम्ब टाकावेत म्हणून ते अमेरिकेची मनधरणी करत असत. (इराण शिया मुस्लिमांचा देश आहे, बाकी मध्यपूर्व सुन्नी आहे.) त्या-त्या देशांतील अमेरिकन राजदूतांनी तशा अत्यंत खासगी गोपनीय ई-मेल आपल्या अमेरिकन वरिष्ठांना पाठवल्याचे विकिलिक्सने बाहेर आणले.

मुद्दा हा की, प्रसारस्वातंत्र्य देशाच्या मर्यादा ओलांडून काय थराला जाऊ शकते हे विकिलिक्सने दाखविले. हा गौप्यस्फोट अर्थातच या तथाकथित विकसित लोकशाही देशांना झेपला नाही. ही माहिती बाहेर येऊ लागताच पहिल्या काही दिवसांतच स्वीडन या देशाच्या कोर्टाने असांगेवर वॉरंट बजावले. असांगेने त्याच्या संघटनेतील दोन स्वयंसेविकांवर बलात्कार केल्याचा आरोप करण्यात आला. असांगेच्या म्हणण्यानुसार बलात्कार नव्हता तर त्यांच्या संमतीने शरीरसंबंध झाला. हा गुन्हा दाखल झाला तेव्हा असांगे ब्रिटनमध्ये होता. तो स्वत:हून पोलिसांच्या हवाली झाला. त्याला जामीन देण्यासाठी इम्रानखानची आधीची बायको जेमिमा खान, तारीक अली नावाचा मुस्लिम कम्युनिस्ट विचारवंत वगैरे श्रीमंत, बुद्धिजीवी लोक पुढे आले. पहिला जामीन नाकारला गेला, मग असांगेला तुरूंगात टाकण्यात आले. पण काही दिवसांतच पुन्हा अपील होऊन दुसरा जामीन स्वीकारण्यात आला. आता तो या जामीनावर स्थानबद्ध आहे. दरम्यान त्याला अमेरिकन कोर्टात खेचण्याचा अमेरिकेचा कसोशीचा प्रयत्न आहे. अमेरिका त्यात यशस्वी झाली तर अमेरिकन तुरूंगात आपल्याला आयुष्य खितपत काढावे लागेल किंवा तुरूंगात ठार मारण्यात येईल अशी साधार भीती असांगेने व्यक्त केली आहे.

या प्रकरणात एक-दोन गोष्टी लक्षात घेण्यासारख्या आहेत. अगदी The Economist किंवा Time सारख्या लाचार भांडवलशाही प्रकाशनांचे पुरस्कार असांगेला मिळालेले आहेत. तरीही डिवचले गेल्यास त्याच भांडवलशाही संदर्भचौकटीतील राज्यसंस्था अशा माणसाच्या जीवावर उठू शकतात. दुसरे म्हणजे स्वीडन हा देश पाश्चिमात्त्य लोकशाही देशात अधिक सहिष्णु मानला जातो. पण अमेरिकेच्या दबावाखाली तो देशही कायदे वळवून असांगेला अमेरिकेच्या हवाली करण्याची शक्यता आहे. (असांगेचा 'गुन्हा' स्वीडनमध्ये घडला.)

याच पातळीवरची म्हणजे आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठित पुरस्कार मिळूनही राज्यसंस्थांनी दडपशाही चालवलेली दोन प्रसिद्ध उदाहरणे आहेत.

पहिले म्हणजे ब्रह्मदेशातील (आता म्यानमार) आंग सांग सूची. त्यांना १९९१ साली शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला. तरीही ब्रह्मदेशातील लष्करी राजवटीने त्यांना गेली अनेक वर्षे स्थानबद्ध करून ठेवले होते. नोव्हेंबर २०१० ला त्यांची सुटका झाली. दरम्यान ब्रह्मदेशात दिखाऊ निवडणुका झाल्या. पण त्यांच्या पक्षास निवडणुकात भाग घेणेही शक्य नव्हते. म्हणजे सत्ता मिळवणे शक्य नव्हते. त्यांचा 'गुन्हा' एवढाच, की ब्रह्मदेशातील लष्करी राजवटी विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आणि लोकशाहीची मागणी केली.

दुसरे उदाहण चीनचे. तेथील लिऊ झिआबोने चीनमध्ये अभिव्यक्ती स्वातंत्र्य, म्हणजे सत्ताधीशांवर टीका करण्याचा अधिकार असावा ही मागणी सतत लावून धरली. (तो मानवी हक्कांचा चीनमधील प्रमुख समर्थक आहे.) त्यामुळे खवळून तेथील दमनकारी राजवटीने त्यांना अटकेत टाकले. २०१० चे शांततेचे नोबेल पारितोषिक झिआबोला मिळाले. त्याचा तर चिनी राजवटीला फारच संताप आला. पाश्चिमात्य सांस्कृतिक वसाहतवादाचा हा चीनविरुद्धचा जाणून बुजून केलेला उर्मटपणा आहे असे चीन सरकारने मानले. नोबेल पारितोषिक घ्यायला तर झिआबोला जाऊन दिले गेले नाहीच, पण त्यांच्या समर्थकांनाही चीनबाहेर जाण्याची बंदी करण्यात आली.

रशियामध्येही चीन, ब्रह्मदेश सारखीच परिस्थिती आहे. वाल्दिमिर पुतीन रशियाचे अध्यक्ष झाल्यापासून अंतर्गत विरोधावर कडक नियंत्रणे आली. पुतीन आधी अध्यक्ष होता नंतर घटनात्मक पळवाटा काढून आता पंतप्रधान आहे. नाममात्र अध्यक्ष मेदवेदेव असले, तरी खरी सत्ता पुतीनच्याच हातात आहे. २००४ साली तो अध्यक्षपदाची दुसरी निवडणूक लढवू इच्छित होता. २००२ पासून मायकेल खोदोर्कोवस्की नावाचा उद्योगपती या आगामी निवडणुकीत पुतीनला आव्हान देऊ इच्छित होता. १९९३ साली खोदोर्कोवस्की रशियाचा उपऊर्जामंत्री होता. २००२-३ च्या सुमारास तो रशियातील सर्वात श्रीमंत व्यक्ती होता. रशियाच्या सगळ्यात मोठ्या तेल कंपनीचा तो मालक होता. पुतीनला हा विरोध सहन होत नव्हता. मग या तेल कंपनीत आर्थिक गैरव्यवहार केल्याच्या आरोपावरून २००३ साली खोदोर्कोवस्कीला अटक करण्यात आली. त्याच्यावर खोटेनाटे बरेच आरोप करून या ना त्या कारणावरून त्याला आजवर तुरूंगात ठेवण्यात आले आहे. एका शिक्षेअंतर्गत तुरूंगवास संपायच्या आतच पुढची केस लादली जाते आणि नवीन शिक्षेअंतर्गत नवीन तुरूंगवास सुरू होतो. २००३ च्या अटकेनंतर २००५ ला त्याला आठ वर्षांची तुरूंगवासाची शिक्षा झाली. आता डिसेंबर २०१० ला दुसऱ्या एका आरोपाखाली आणखी १४ वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. थोडक्यात, त्याचे राजकीय अस्तित्व संपवण्याचे हे पद्धतशीर धोरण आहे.

रशियाचा एक माजी उपपंतप्रधान नेमत्सोव हाही पुतीन राजवटीचा विरोधक आहे. त्यालाही या डिसेंबरमध्ये पुतीनविरुद्ध निदर्शने केल्याबद्दल अटक करून विनाआरोप तुरूंगात ठेवण्यात

आले आहे.

चीन, ब्रह्मदेश किंवा रशिया या तर काही ना काही प्रकारच्या हुकूमशाही राजवटी आहेत. पण हाच प्रकार कमी तीव्रतेने व कमी प्रमाणात विकसित लोकशाहीत आढळतो. पश्चिमेला सध्या भेडसावणारी भीती मुस्लिम आतंकवादाची आहे. मग या संशयावरून मुस्लिमांना चौकशीविना तुरूंगात डांबण्यात येते. ही प्रक्रिया २००६ सालापासून चालू झाली. २००९ सालापासून आतंकवादाविरोधी लढ्यामध्ये आणखी एक धोरण आखण्यात आले आहे. त्यानुसार सर्व प्रकारच्या (म्हणजे, हिंसक किंवा अहिंसक) मूलतत्त्ववादाविरुद्ध सरकार कारवाई करू शकेल. मूलतत्त्ववादाची व्याख्याच करण्यात आलेली नाही. त्यामुळे ती व्यापक आणि संदिग्ध मानून कोणालाही मूलतत्त्ववादी जाहीर करता येऊ शकते.

उदाहरणार्थ, इस्रायलचे अस्तित्व नाकारण्याची भूमिका एखाद्या मुस्लिम गटाने घेतली तर तो मूलतत्त्ववाद होऊ शकतो. पण त्याच वेळी ब्रिटिश गोरा नागरिक एखाद्या स्वयंसेवी संघटनेच्या छत्राखाली इस्रायलच्या वतीने पॅलेस्टाईन विरुद्ध प्रत्यक्ष लढू शकतो. तो मूलतत्त्ववाद होत नाही किंवा ब्रिटिश स्वयंसेवी संघटना मूलतत्त्ववादी ज्यूंच्या संघटनांसाठी अधिकृतरित्या पैसा उभा करू शकतात. गेली काही वर्षे आंतरराष्ट्रीय निषेधांना न जुमानता पॅलेस्टाईनच्या वेस्ट बँक या प्रदेशात इस्रायल सातत्याने ज्यू लोकांच्या वसाहती स्थापन करत आहे. या वसाहती आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार बेकायदेशीर आहेत असे ब्रिटिश सरकारचे अधिकृत धोरण आहे. आता या धोरणानुसार जर एखाद्या मुस्लिमाने या इस्रायली वसाहतवादाविरुद्ध आवाज उठवला तर सरकार मूलतत्त्ववादविरोधी नव्या धोरणानुसार या व्यक्तीला विनाचौकशी तुरूंगात डांबू शकते! दडपशाही करायची म्हटली, की असे धोरणात्मक अंतर्विरोध उघड होतात.

मग हे अंतर्विरोध उघड होऊ नयेत. लोकांसमोर चव्हाट्यावर येऊ नयेत म्हणून नवीन छुपे मार्ग अवलंबले जात आहेत.

म्हणजे, वर दिलेल्या उदाहरणानुसार, समजा एखाद्या मुस्लिमाला इस्रायलच्या दहशतवादाविरुद्ध निषेध केला म्हणून मूलतत्त्ववादी या आरोपाखाली अटक करण्यात आली तर शक्यता अशी असते की, तो आरोपी न्यायालयात आपण सरकारच्या वेस्ट बँकेत वसाहती स्थापन करण्याच्या विरोधी आधीच्या धोरणानुसारच निषेध करत होतो असे म्हणू शकतो. मग सरकार आपल्याच परस्परविरोधी धोरणांमध्ये कायदेशीररीत्या कसे अडकले आहे हे उघड होऊ शकते. ही शक्यता टाळण्यासाठी सरकारतर्फे आता 'गुप्त' पुरावे देण्यात येतात. म्हणजे हे पुरावे सार्वजनिक परीक्षणाखाली तर येतच नाहीत, पण आरोपीला ते माहिती नसतात. ते फक्त फिर्यादी सरकार व न्यायालय यांच्यातच राहतात. मग बाकी मानवी हक्कांसाठी झगडणाऱ्या संघटना तर दूरच. दुसऱ्या शब्दांत कोणत्याही कारणासाठी बेमुदत अटक करण्याची मुभा आज लोकशाहीच्या या तथाकथित संस्थापक ब्रिटनला आहे. आपोआपच आरोपीला आपल्यावरील आरोपांना आव्हान देण्याची संधी नाकारली जाते.

इंदिरा गांधींच्या आणीबाणी पर्वातील सरकारी मनमानी आजच्या ब्रिटनने राजरोस अंगिकारली आहे.

लेखाच्या शेवटी आता अशा धोरणांची परिणती काय होते ते पाहू.

न्यायालयीन प्रक्रिया सुरू होण्याच्या आधीच्या तुरूंगवासाने किंवा बनावट आरोपांखाली दिलेल्या शिक्षेने राजकीय विरोधकांचे मनोपरिवर्तन होताना जगात कोठेच दिसत नाही. विशेषत: मुस्लिम हुकूमशाही असणाऱ्या मध्यपूर्वेतील देशांत अनेक विरोधकांना अनेक वर्षे तुरूंगात ठेवण्यात आलेले आहे, त्यांचा अनन्वित शारीरिक छळही करण्यात आलेला आहे. सुटका झाल्यावर सरकारची अपेक्षा अशी असते की ते चुपचाप आयुष्य जगायला लागतील. पण सुटका झाल्या झाल्या हे विरोधक परत तितक्याच तीव्रतेने सरकारच्या विरोधात उभे राहताना दिसतात.

मग या अटकसत्रांचा निश्चित फायदा सरकारला काय होतो? फायदा झालाच तर एवढाच होतो, की जे सौम्य लोक अशा विरोधाला सहानुभूत आहेत ते घाबरून गप्प बसणे पसंत करतात किंवा जे कुंपणावर असतात ते विरोधाच्या बाजूने मैदानात उतरत नाहीत, पण वस्तुत: त्यांचा विरोध तीव्रच होतो. ज्यांनी तुरूंगवास भोगलेला आहे त्यांनी वाईटात वाईट काय घडू शकते याचा अनुभव घेतलेलाच असतो. त्यामुळे त्यांच्या राजकीय श्रद्धा आणखीच बळकट होतात.

तात्पर्य, अशा अनैतिक दंडेलशाहीने सरकार आपल्याविरोधी जनमत वाढवायलाच मदत करते. याचे टोकही गाठले जाते. लेख लिहिण्याच्या वेळी फेब्रुवारी पहिल्या आठवड्यात उत्तर आफ्रिकेतील ट्युनिशिया या हुकूमशाही देशाचा तेवीस वर्षे हुकूमशाही करणारा हुकूमशहा सार्वजनिक विरोधामुळे देश सोडून पळून गेला. तीच वेळ इजिप्तच्या होस्नी मुबारक या हुकूमशहापुढे आली आहे. त्याबरोबरच जॉर्डन, येमेन हे अमेरिकेने पोसलेले हुकूमशहा कड्यावर आहेत. दशकानुदशकांच्या सरकारी दडपशाहीचा हा परिणाम आहे.

लेखाच्या शेवटी मायकेल खोदोर्कोवस्कीचे रशियाच्या लोकशाहीवरचे मत नमूद करतो -

खोदोर्कोवस्कीच्या शब्दांत रशियाची लोकशाही ही नियंत्रित लोकशाही आहे. म्हणजे, तत्त्वत: प्रसारमाध्यमे सरकारविरोधी भूमिका घेऊ शकतात पण सरकारी वरवंट्याच्या भीतीने ती स्वत:हूनच सेन्सॉरशिप लावून घेतात आणि सरकारविरोधी टोकाचा आवाज उठवत नाहीत. तत्त्वत: निष्पक्षपाती न्यायालयेही अस्तित्वात आहेत, पण सरकारी धोरणाचा अंदाज घेऊनच सरकारला मान्य होतील असेच निर्णय न्यायालये घेतात. तत्त्वत: नागरी स्वातंत्र्य आणि हक्क घटनेत नमूद केलेले आहेत पण

प्रत्यक्षात तुम्ही ते संपूर्ण स्वातंत्र्यही उपभोगू शकत नाही किंवा ते हक्कही तुम्हाला नसतात.

***चन्द्रशेखर पुरन्दरे***
*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

❒